(40)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

1. District (जिल्हा): अहमदनगर P.S. (पोलीस ठाणे): राहाता Year (वर्ष): 2019

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0225 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 15/09/2019 09:45 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शनिवार Date from (दिनांक पासून): 14/09/2019 Date To (दिनांक पर्यंत): 14/09/2019

Time Period (कालावधी): प्रहर ६ Time From (वेळेपासून): 16:16 तास Time To (वेळेपर्यंत): 16:27 तास

(b) Date of Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा दिनांक): 15/09/2019 Time (वेळ): 01:43 तास

(c) General Diary Reference No. (सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक): 003 Date and Time(दिनांक आणि वेळ): 15/09/2019 01:43 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलीस ठाण्यापासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 01 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): ग्रामिण रुग्नालय राहाता, राहाता, राहाता

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणार):

(a) Name (नाव): प्रसाद दिपक गाढवे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1995 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत



Scanned by CamScanner

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदार कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता): |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | Town/Village (शहर / गाव): रांजणगाव, Tehsil (तहसील): राहाता, Police Station (पोलीस ठाणे): राहाता , District (जिल्हा): अहमदनगर, State (राज्य): महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पत्ता | Town/Village (शहर / गाव): रांजणगाव, Tehsil (तहसील): राहाता, Police Station (पोलीस ठाणे): राहाता , District (जिल्हा): अहमदनगर, State (राज्य): महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9834245228

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | balasheb gopinath bachkar | | | 1. Town/Village (शहर / गाव): राहाता,Tehsil (तहसील): राहाता,Police Station (पोलीस ठाणे): राहाता,District (जिल्हा): अहमदनगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):



Scanned by CamScanner

Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000रुपये रोख | 4,000.00 |

16. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :
4,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (अकस्मात मृत्यू प्रकरण क्रं.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद

दि. 14/09/2019

मी प्रसाद दिपक गाढवे वय 24 वर्षे धंदा शेती व ट्रॅक्टर व्यवसाय रा.रांजणगांव ता.राहाता जिल्हा अहमदनगर मोबाईल नंबर- 9834245228

समक्ष फिर्याद देतो की,मी वरिल पत्यावर कुटंुबासह राहण्यास असुन मी दि. 14/09/2019 रोजी ॲन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर युनिट कार्यालयातील श्री.हरिष खेडकर,पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर यांचेषी संपर्क करून त्यांना एका लोकसेवका विरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली. त्यावर पो उप अधिक्षक श्री.खेडकर यांनी मला दि.14/09/2019 रोजी दुपारी 2-00 वा सुमारास राहाता ते बाभळेश्वर रोडवरील दंडवते ट्रॅक्टर शो रूम जवळ मोटारसायकल व लाच म्हणुन देण्याचे रक्कमेसह हजर राहणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी हजर राहीलो तेथे पो उप अधिक्षक श्री.खेडकर,पोनि करांडे हे सापळा पथक व पंचासह षासकिय वाहनाने आले. पो उप अधिक्षक श्री.खेडकर यांनी माझी ओळख विचारून, मला पो.नि.श्री.करांडे,स्टाफ व पंच श्री.दानिश इनामदार व श्री. गणेष दळवी यांची ओळख करून दिली. त्यानंतर पो उप अधिक्षक श्री.खेडकर यांचे सुचने प्रमाणे पंचांनी माझे नांव पत्ता विचारत मी त्यांना वरिल प्रमाणे नांव पत्ता सांगुन तोंडी तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी रहाण्यास असुन शेती व्यवसाय करतो. माझेकडे माझा मावस भाउ श्री.मच्छिंद्र गायकवाड रा.बापतारा ता.वैजापुर जिल्हा औरंगाबाद यांच्या मालकीचा परंतु मी विकत घेतलेला स्वराज कंपनीचा 735 मॉडेलचा ट्रॅक्टर नंबर एमएच-20-डीझेड-333 हा असुन तो ट्रॅक्टर मी शेती काम व भाडोत्री कामासाठी वापरतो. दिनांक 12/09/2019 रोजी मी व माझा भाउ श्री.अशोक दिलीप गाढवे असे आम्ही ट्रॅक्टर घेवून रांजणगांव ते अस्तगांव रोडने जात असतांना राहाता पोलीस स्टेशन मधील पोलीस हवालदार श्री.सांगळे व पोलीस शिपाई श्री.बाचकर यांनी ट्रॅक्टर आडविला, त्यावेळी मी त्यांना विचारले की, काय झाले ? त्यावर पो.हवा.श्री.सांगळे म्हणाले, तु या ट्रॅक्टने वाळु वाहतुक करतो, त्यामुळे तुझे ट्रॅक्टरवर कारवाई करायाची आहे. तु हा ट्रॅक्टर राहाता पोलीस स्टेशनला घे. यावेळी मी त्यांना म्हणालो, सागळे दादा ट्रॅक्टरची ट्रॉली आता रिकामी आहे, मी आता वाळु वाहतुक करीत नाही. विनाकारण का खोटी कारवाई करताय ? त्यावेळी ते मला म्हणाले, तु मला शिकवु नको, तु वाळु वाहतुक करतो मला माहीत आहे. असे बोलुन त्यांनी श्री.बाचकर यांना म्हणाले की, तु ट्रॅक्टर घेवुन पोलीस स्टेशनला ये. त्यावर कारवाई करायची आहे. असे बोलुन निघुन गेले. त्यावेळी मला श्री.बाचकर यांनी ट्रॅक्टर राहाता पोलीस स्टेशनला घेण्यास



Scanned by CamScanner

सांगितला. त्यावेळी मी श्री.बाचकर यांना विनंती केली की, विनाकारण खोटा गुन्हा दाखल करून नका, ट्रॅक्टर रिकामा आहे. तेव्हा श्री.बाचकर मला म्हणाले की, सांगळे दादांनी मला कारवाई करायला सांगितली आहे. ट्रॅक्टर सोडायचा असेल व त्यावर कारवाई करायची नसेल तर तु मला 10,000/- रूपये दे, त्यावेळेस श्री.सांगळे व बाचकर हे ट्रॅक्टरवर गुन्हा दाखल करतील या भिती पोटी मी त्यांना 5000/-रूपये दिले व एव्हडयात मिटुन घ्या. असे म्हणालो. तेव्हा श्री.बाचकर मला म्हणाले, सांगळे दादा एव्हडयात ऐकनार नाही, तु आणखीन 5000/- रूपये दे, मी त्यांना नंतर देतो. असे म्हणालो. तेव्हा श्री.बाचकर यांनी चिडुन जावुन त्यांनी माझे खिसे तपासले परंतु पैसे न मिळाल्याने माझा भाउ अशोक गाढवे यांचे खिसे तपासुन त्याचेकडुन 600/- रूपये काढुण घेतले. त्याचेकडे आणखीन रक्कम नसल्याने त्याचे हातातील चार भार वजनाचे चांदीचे ब्रासलेट काढुण घेतले व मला म्हणाले 5000/- रूपये आणून दिले तर ब्रासलेट परत देईल नाही तर ट्रॅक्टरवर गुन्हा नोंदवितो. त्यावेळी त्यांना भिती पोटी हो म्हणालो व कधी पैसे आणून देवु असे म्हणालो. तेव्हा ते म्हणाले की, दोन दिवसाचे आत पैसे घेवुन ये. असे बोलुन ट्रॅक्टर सोडुन दिला व ते निघुन गेले. त्यावेळी माझे लक्षात आले की, बाचकर हे मला गुन्हा नोंदवयाची भिती घालुन लाच मागत आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज श्री.बाचकर यांची भेट घेवुन त्यांच्याकडे माझे ब्रासलेट मागणार आहे व ट्रॅक्टरवर गुन्हा न नोदविणे सबंधाने बोलणी करणार आहे. त्यावेळी श्री.बाचकर यांनी माझेकडे वरील कारनास्तव लाचेची मागणी केल्यास त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करावी. श्री.बाचकर यांच्याशी माझा व माझे भावाचा कोणत्याही प्रकारचा आर्थिक देण्याघेण्याचा उधारी,उसणवारीचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही.वगैरे तक्रार सांगितली. त्यावर पो उप अधि श्री.खेडकर यांनी पोनि श्री.करांडे यांना पुढील कारवाई करणे बाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. श्री.करांडे यांनी मला माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून देणेबाबत कळविले असता, मी माझी वरील प्रमाणे कथन केलेली तोंडी तक्रार माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.

त्यानंतर मी श्री.बाचकर,पोलीस राहाता पोलीस स्टेषन यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.नि.श्री. करांडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत व हाताळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पो.नि.करांडे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून,व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पो.नि करांडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.। श्री.इनामदार यांना सुचना समजावुन सांगितल्या, त्यावेळी मी त्यांना सांगितले की, श्री.बाचकर पोलीस हे माझे मोबाईलवर सारखे फोन करून मला घोलप मंगल कार्यालय येथे बोलांवित आहे.त्यावेळी पो.नि.करांडे यांनी मला व पंच नं.। श्री.इनामदार अशांना माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन श्री.बाचकर,पोलीस यांची भेट घेण्यासाठी घोलप मंगल कार्यालय येथे माझेकडील नविन होंन्डा शाईन मो.सा. वर रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.। श्री.इनामदार यांचेसह रवाना होवुन घोलप मंगल कार्यालय जवळ जावुन श्री. बाचकर पोलीस यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना चहा घेण्याची विनंती केली असता, श्री.बाचकर पोलीस यांनी माझी मोटार सायकल पंच नं.। यांना घेण्या बाबत सुचित करून मला त्यांचे ब्रिजा कार मध्ये बसुन काही अंतरावर असलेल्या चहाचे दुकानात गेलो. पंच नं.। श्री.इनामदार सुध्दा आमचे मागे मोटार सायकल घेवुन चहाचे दुकानात येवुन आमचे शेजारी बसले. तेव्हा बाचकर पोलीस यांनी माझे घेतलेले ब्रेसलेट देण्यासाठी तसेच माझे ट्रॅक्टरवर कारवाई न करण्याचे मोबादल्यात 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4,000/- रूपये लाचेची मागणी केली.त्यानंतर मी व पंच नं.। श्री.इनामदार असे माझे मो.सा. पो.नि.करांडे थांबले त्याठिकाणी निघुन आलो. त्यानंतर तेथे पो.नि करांडे यांनी माझेकडे व पंच नं.। यांना रवाना केले पासुन घडले हकीकती बददल विचारता मी वरील प्रमाणे सविस्तर हकीकत सांगितली. त्यानंतर पो.नि करांडे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाशण ऐकुन ते मी व पंच नं.। यांनी कथन केले हकीकती प्रमाणे असल्याचे



Scanned by CamScanner

खात्री करून त्याचा उतारा तयार केला, श्री.बाचकर पोलीस यांनी माझ्याकडे स्पश्टपणे 10,000/-रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरूध्द लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर पो.नि करांडे यांनी मला श्री.बाचकर पोलीस यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 4,000/- रूपये त्यात 500/- रू दराचे 8 चलनी नोटा असे समक्ष हजर केले. त्यानंतर ॲन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पोका निमसे यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावली व नोटांची घडी माझे शर्टचे पुढील डाव्या खिष्यात ठेवुन दिली. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळया दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेषीर कारवाई करण्यात आली. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आला.सदर कारवाई दरम्याण श्री.बाचकर पोलीस हे माझे मोबाईलवर सारखे सारखे कॉल यायला लागले.

त्यावर पोलीस उप अधिक्षक श्री.खेडकर,पो.नि.श्री.करांडे व पंचानुमते माझे मोबाईल वरून स्पिकर चालु करून श्री.बाचकर पोलीस यांचे मोबाईलवर कॉल करून स्पिकर चालु ठेवुन लाचेची रक्कम घेवुन कोठे यायचे याबाबत फोन लावुन बोलणे केले असता,श्री.बाचकर पोलीस यांनी मला लाचेची रक्कम घेवुन ग्रामीण रूग्णालय राहाता चे गेट जवळ बोलाविले. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरसह मला व पंच नं.1 इनामदार यांना श्री.बाचकर पोलीस यांची भेट घेण्यासाठी रवाना केले.पाठोपाठ पोलीस उप अधि.श्री.खेडकर, पोनि करांडे सापळा पथकासह ग्रामीण रूग्णालय राहाता चे गेट जवळ येवुन श्री.बाचकर,पोलीस यांचे विरूध्द सापळा लावुन थांबले. श्री.बाचकर पोलीस हे पांढऱ्या रंगाचे एक्टीव्हा दुचाकीवर येवुन थांबले होते. मी त्यांना चहा घेण्याची विनंती केली त्याप्रमाणे मी, पंच नं.1 व श्री.बाचकर अशांनी चहा घेतला. त्यावेळी माझेकडुन 4,000/- रूपये लाचेची रक्कम पंचा समक्ष सांयकाळी 04.27 वा सुमारास स्विकारली व मला माझे चांदीचे ब्रासलेट परत दिले असता,त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले त्यांचेकडुन लाचेची रक्कम पंच 2 करवी हस्तगत करण्यात आली. तसेच ग्रामीण रूग्णालय,राहाता येथील कक्षात लोकसेवक बाचकर पोलीस, माझे, पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी यांचे आवष्यक त्या तपासण्या करण्यात आल्या, त्यानंतर श्री.साई पोलीस विश्रामगृह शिर्डी येथे पंचनाम्यचे पुढील कामकाज केले.

तरी यातील लोकसेवक पोना/2148,बाळासाहेब गोपीनाथ बाचकर वय 32 वर्षे नेमणुक राहाता पोलीस ठाणे जि. अहमदनगर हल्ली रा.सदगुरू अपार्टमेंन्ट, पोकळे हॉस्पीटल समोर,ता.राहाता. जिल्हा अहमदनगर मुळ रा.तमनर आखाडा, ता.राहुरी जिल्हा अहमदनगर यांनी दि.14/09/2019 रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान चार भार वजनाचे चांदीचे ब्रासलेट परत देण्यासाठी तसेच ट्रॅक्टरवर कारवाई न केल्याचे मोबादल्यात म्हणुन 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 4,000/- रूपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दि.14/09/2019 रोजी माझेकडुन पंच साक्षीदार नं.01 श्री.दानिश इनामदार यांचे समक्ष ग्रामीण रूग्णालय, राहाता चे गेट जवळी हॉटेल श्री.साईश्रध्दा टी व नाष्टा सेंन्टर येथे सायंकाळी 4-27 वा. स्विकारून स्वताचा संपात्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी लोकसेवक पोना/2148, बाळासाहेब गोपीनाथ बाचकर वय 32 वर्षे नेमणुक राहाता पोलीस ठाणे जि. अहमदनगर वर्ग 3 यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष ( प्रसाद दिपक गाढवे )

( दिपक करांडे )
पोलीस निरीक्षक



Scanned by CamScanner

ॲन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Subhash Dada Bhoye (पोलीस निरीक्षक) or (किंवा):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) On point of jurisdiction, If F.I.R. Transferred to P.S.
(अधिकारितेच्या मुद्द्यावर प्रथम खबर हस्तांतरीत केला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C.
(आर.ओ.ए.सी.)

Padhave

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

पोलीस ठाणे अमलदार
राहाता पोलीस स्टेशन

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Subhash Dada Bhoye

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): POBN71873

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned by CamScanner